# महासागर नागपूर

# ऑरेंज सिटी

पान ३

शुक्रवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२३


## सतीश उकेसह ७ जणांवर मोक्का ; शासकीय भूखंड हडपल्याचे प्रकरण

**नागपूर, दि. १७ ऑगस्टः** भूखंड हडपण्यासाठी चर्चित वकील सतीश महादेव उके आणि त्याच्या टोळीवर पोलिसांनी मोक्का लावला आहे. शहर पोलिसांनी ५ जानेवारी २०२३ रोजी नासुप्रचे विभागीय अधिकारी पंकज रमेश पाटील यांच्या तक्रारीवरून सतीशसह ६ जणांवर गुन्हेगारी कट रचण्यासह फसवणुकीच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला होता. आरोपींमध्ये सतीश उके, प्रदीप उके, प्रदीपची पत्नी माधवी, भाऊ शेख उके, मनोज उके, सुभाष मणीलाल बघेल आणि चंद्रशेखर मते याचा समावेश आहे. विशेष म्हणजे आरोपींपैकी ५ जण सतीशच्याच कुटुंबातील आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी मौजा बाभुळखेडा परिसरातील नासुप्रच्या ४,१०० वर्ग मीटर भूखंडावर अवैध ताबा केला होता. बनावट कागदपत्रांद्वारे लेआऊट टाकून लोकांना प्लॉट विकण्यात आले. या भूखंडाची सध्याची किंमत जवळपास ७.४३ कोटी रुपये आहे. तपासात, सतीश आणि इतर आरोपी संघटीतरित्या बोगस कागदपत्र तयार करून आणि लोकांना धमकावून भूखंड हडपण्याचे काम करतात. गत २० वर्षांमध्ये उके विरुद्ध ११ गुन्हे नोंद झाल्याचे स्पष्ट झाले. संघटितरित्या होत असलेले गुन्हे पाहता पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी उके टोळीवर मोक्का लावण्याचे आदेश दिले. अजनी ठाण्यात नोंद प्रकरणात पोलिसांनी मोक्काच्या कलम वाढविल्या आहेत. प्रकरणाचा पुढील तपास एसीपी अजनी करणार आहेत.

सतीश उके वकील असल्याचा आणि मोठ्या नेत्यांशी संबंध असल्याचे सांगून लोकांना घाबरवत होता. आता मोक्का लागल्यानंतर प्रकरणाचा नव्याने तपास सुरू होईल.

## क्राईम कॉर्नर

### अपघातात पुन्हा दोघांचा मृत्यू

**शहरात वाढताहेत रस्ते अपघात**

**नागपूर, दि. १७ ऑगस्टः** शहरातील रस्ते अपघातांमध्ये सतत वाढ होत आहे. दररोजच दोन-तीन जणांचा अपघातात बळी जात आहे. आता पुन्हा दोन जणांना अपघातात जीव गमवावा लागला आहे. पहिली घटना कपिलनगर ठाण्यांतर्गत म्हाडा कॉलनी परिसरात घडली. निखिल किसन मेश्राम (२८) असे मृताचे नाव आहे.

१३ ऑगस्टच्या रात्री १०.३० वाजताच्या सुमारास निखिल घराजवळ फिरत होता. या दरम्यान भरधाव आलेल्या चारचाकी वाहन क्र. एमएच-४९/बीझेड-७७९ च्या चालकाने त्याला जबर धडक दिली आणि फरार झाला. डोके आणि छातीला गंभीर मार लागल्याने त्याला मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले. उपचारादरम्यान निखिलचा मृत्यू झाला. या प्रकरणात आधी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती.

दुसरी घटना गिट्टीखदान ठाण्यांतर्गत घडली. दुचाकी वाहनस्वार मायलेकाला ट्रक चालकाने जबर दिली. या अपघातात आईचा मृत्यू झाला. सीमा किशोर चौधरी (४०) रा. सुरेंद्रगड असे मृत महिलेचे नाव आहे. बुधवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास सीमा आपल्या मुलाच्या दुचाकी वाहनावर मागे बसून प्रेरणा कॉलनीकडे जात होत्या. मंगलमूर्ती रेसिडन्सीजवळ ट्रक क्र. एमएच-३१/एफसी-७१ ३ च्या चालकाने त्यांच्या वाहनाला जबर धडक दिली. सीमा ट्रकच्या बाजूने पडल्यामुळे चाकाखाली येऊन त्यांचा मृत्यू झाला तर मुलगा थोडक्यात बचावला. आसपासच्या नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. यामुळे घाबरून आरोपी ट्रक चालक वाहन सोडून पसार झाला. गंभीर जखमी सीमा यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पोलिसांनी आरोपी वाहन चालकावर विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून शोध सुरू केला आहे.

### काटेरी झुडूपात मिळाला मृतदेह

**परिसरात खुनाची चर्चा**

**नागपूर, दि. १७ऑगस्टः** गत काही दिवसांपासून शहरात हत्याकांडाचे सत्र सुरू आहे. या घटनांनी नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरत चालले आहे.बुधवारी रात्री एमआयडीसी ठाण्यांतर्गत राकेश मिश्राच्या खुनाचा तपास सुरू असतानाच गुरुवारी सकाळी अजनी ठाण्यांतर्गत राजर्षीनगर परिसरात काटेरी झुडूपांमध्ये एक मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. घटनास्थळ आणि मृतदेहाची स्थिती पाहून खुनाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र सध्या पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. मृताची ओळख अद्यापही पटलेली नाही. वय अंदाजे ३५ वर्षे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामटेकेनगर टोलीलगतच असलेल्या राजर्षीनगरच्या कचरा डम्पिंग परिसरातून आसपास राहणाऱ्या नागरिकांना दोन दिवसांपासून भयंकर दुर्गंध येत होता. परिसरात शोध घेतला असता काही लोकांना झुडूपांमध्ये एक मृतदेह दिसला. पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. अजनीचे ठाणेदार नितीन फटांगरे पथकासह घटनास्थळावर पोहोचले. मृतदेह कुजलेल्या स्थितीत होता. अर्धे शरीर सडलेले होते आणि काही भाग जनावरांनी खाल्ला होता. मृतकाचा मृतदेह पोटाच्या भारावर काटेरी झुडूपात होता. जंगली झुडूपात इतके काटे होते की, मृतदेहापर्यंत पोहोचणे खूपच कठिण होते. पोलिसांनाही मृतदेहापर्यंत पोहोचण्यासाठी आधी मजुरांच्या मदतीने झुडूपांची सफाई करावी लागली. मृत्यू होऊन कमितकमी ४-५ दिवस झाल्याने ओळख पटविणे कठिण झाले आहे. मात्र जोपर्यंत मृताची ओळख पटत नाही काहीही निष्कर्ष काढता येऊ शकत नाही. पोलिस निरीक्षक फटांगरे यांनी सांगितले की, पोलिसांनी सध्या अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. उत्तरीय तपासणी अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल. पोलिस सर्व दिशेनी प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## दिव्यांग कर्णबधीर मुलींना हक्काचे वसतिगृह मिळेल : सौम्या शर्मा

**नागपूर, दि. १७ ऑगस्टः** जिल्ह्यातील दुर्गम भागातील दिव्यांग कर्णबधीर शाळेतील मुलींना वसतिगृहाची पक्की इमारत नव्हती, आता त्यांनी सर्व सोईनीयुक्त अशी इमारत मिळेल. त्यामुळे त्यांच्या गुणवत्तेत निश्चितच वाढ होणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनी सांगितले.

दिव्यांग कर्णबधीर मुलींच्या वसतिगृहाच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. एम.एल. पेंडसे फॉऊंडेशन मुंबईचे विश्वस्त ड शशांक मनोहर, वर्षा मनोहर, सत्यनारायण भारतिया, जिल्हा समाज कल्याण अधिकारी किशोर भोयर, शाळेच्या प्राचार्या डॉ. सांगोळे यावेळी उपस्थित होत्या. जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकड्डे यांनी मुलींच्या वसतिगृहाच्या शाळेचे भूमीपूजन केले.

दिव्यांगासाठी नागपूरातील एकमेव शाळा अशी जूनी ख्याती असलेल्या या शाळेमुळे दिव्यांग मुलींच्या सूप्त गुणांना वाव मिळेल. सोबतच त्यांचे जीवन सुकर होईल,



असे श्रीमती शर्मा म्हणाल्या.

सामाजिक कार्याच्या जाणिवेतून हे कार्य करीत असल्याचे शशांक मनोहर यांनी सांगितले. आपल्याला समाजाचं काही देणं असते, त्यातूनच ही परतफेड आहे. दिव्यांगाच्या मदतीसाठी आपण सदैव तत्पर असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सांगोळे यांनी केले तर संचालन व आभार शिक्षिका उत्तरा पटवर्धन यांनी केले. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर अप्रतिम नृत्य सादर केले. या कार्यक्रमास शाळेचे शिक्षक, शिक्षीका, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

## महाज्योतीच्या प्रशिक्षण योजनेत ९२ विद्यार्थ्यांना घवघवीत यश

**नागपूर, दि. १७ ऑगस्टः** मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्राध्यापक, सहायक प्राध्यापक पदाची संधी मिळावी या उद्देशाने युजीसी नेट,सीएसआयआर नेट, एमएच सेट परीक्षापूर्व प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. याकरीता प्रशिक्षणास इच्छूक नॉनक्रिमीलेअर उत्पन्न गटातील उमेदवारांकडून महाज्योतीच्या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात आले. प्रशिक्षणासाठी एकूण १५५६ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या १२०७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ घेता आला. ११२७ विद्यार्थ्यांना ऑफलाईन तर ८० विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले. यातील ९२ विद्यार्थ्यांनी सेट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपूर व सीआरजी अकादमी फॉर सस्केस पुणे या संस्थेमार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी युजीसी नेट, सीएसआयआर नेट, एमएच सेट परीक्षापूर्व प्रशिक्षण योजना राबविण्यात येते. याअंतर्गत एमएच सेट परीक्षा प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, आवश्यक व अकस्मिक गरजेकरीता सहा महिने विद्यावेतन देण्यात आले. मोफत प्रशिक्षणात निवडण्यात आलेल्या विषयाचे वर्ग, विषयवार चर्चा, प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यात आल्या.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये प्रियंका ठाकरे, परमेश्वर दास, वैभव कापसे, भुपेंद्र ढाले, महेश भांडे, भावीका शिंदे, अश्विनी वडे, उमेश पालवे, रिना चव्हाण, खुशवंत नांथे, विशाल आदमने, अपेक्षा गावंडे, विष्णू गोरे, मनिषा तोरकडे, विकास पिसे या व इतर विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच महाज्योती तर्फे राबविण्यात येणाऱ्या युजीसी नेट, सीएसआयआर नेट, एमएच सेट परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेचा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## स्वातंत्र्यदिनी सीआयडी प्रकल्पाचे उद्घाटन




**नागपूर, दि. १५ ऑगस्टः** नागपुरातील अग्रगण्य 'संकल्प व्यसनमुक्ती केंद्र हिंगणा येथे ७६ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मध्य भारतातील सुप्रसिद्ध ईईसीपी थेरपी व हृदयरोग तज्ञ श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल' त्रिमूर्ती नगर, नागपूर चे संचालक डॉक्टर प्रदीप पाटील सर यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या प्रसंगी सीआयडी (कम्युनीटी इनीशिएटीव डी-एडीकशन प्रोग्राम) या प्रकल्पाचे मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. प्रकल्पाच्या नियोजना संदर्भात माहिती देतांना संस्थेचे अध्यक्ष श्री प्रवीण टिप्रमवार यांनी सांगितले की आपण या प्रकल्पाच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना एकत्र करून व्यसनाधीनता या गंभीर आजारावर जनजागरण आणि उपाय योजना अश्या दोन्ही बाबींवर एकाचवेळी काम करणार आहोत.

या प्रसंगी डॉक्टर प्रदीप पाटील सर यांनी आपल्या वैद्यकीय अनुभवातून काही प्रसंग शेअर करित उपस्थित उपचाराधीन सदस्यांचे मनोधर्य उंचाविले. सीआयडी प्रकल्पाच्या यशस्वीते साठी आपण नेहमीच सहकार्य करणार याचे त्यांनी यावेळी आश्वासन दिले.

प्रकल्पाच्या निर्देशिका कु. मनीषा प्रधान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सहनिर्देशक श्री. चेतन वडसकर यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

यावेळी सौ. उज्वला ताई प्रवीण टिप्रमवार, प्रकल्प समन्वयक कू. प्राची भैसारे, सहाय्यक कु. मनीषा मेश्राम, सहाय्यक प्रतिक बनसोड, मनीष निंबाळकर, गौतम पायराला, कुंदन अर्वट, राजू पाटील, स्नेहांशु बोरकर, संजय महल्ले, आयुष आदेवार इत्यादी प्रकल्प सदस्य उपस्थित होते.

## विजाभज आश्रमशाळा शिक्षक -कर्मचाऱ्यांना तात्काळ वेतन तरतूद उपलब्ध करा

**आमदार सुधाकर अडबाले यांचे अर्थमंत्र्यांना पत्र**

**नागपूर, दि. १७ ऑगस्टः** इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक - कर्मचाऱ्यांचे वेतन तीन महिन्यांपासून झालेले नाही. शासनाकडून माहे जून महिन्याची वेतन तरतूद अपूरी प्राप्त झाल्यामुळे सर्वच जिल्ह्यातील निम्या आश्रमशाळांचे वेतन थकीत आहे. तीन महिन्यापासून वेतन न झाल्यामुळे विजाभज आश्रमशाळांच्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची पाळी आली आहे. त्यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांना पत्र लिहून तात्काळ तरतूद उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी विजाभज आश्रमशाळांच्या वेतनाकरिता होणाऱ्या दिरंगाईबाबत नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न लावून शासनाचे लक्ष वेधले. विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी यापुढे वेतन नियमित करू व वेतनास विलंब झाल्यास कारणीभूत घटकावर शासननिर्णयानुसार कारवाई करू, अशी ग्वाही दिल्यानंतरही वेतनाबाबत जैसे-थे परिस्थिती असल्यामुळे आमदार अडबाले यांनी मुख्यमंत्री नाम. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री नाम. अजित पवार व विभागाचे मंत्री नाम. अतुल सावे यांना पत्र लिहून तात्काळ तरतूद उपलब्ध करून देण्याची मागणी केली.


**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

The Executive Engineer, MSEDCL, Civil Lines Division invites e-Tender in two bid system from experienced reputed Agency having experience of similar work in MSEDCL & completing the formalities for Annual Contract for meter reading & bill printing of IP, Streetlight, Agriculture consumers having load up to 20 KW (Without CMRI) & CTM consumers having load above 20KW through CMRI under Lashkaribagh Sub-Division of Civil Lines Division having Tender No. EE/CL/DN/T/CT-IPreading/23-24/T-01. The Tender fees & other details are available on website etender.mahadiscom.in/eatApp//. The Tender documents can be downloaded from aforesaid website from **dt.18.08.2023.** Submit the tender duly filled in on or before **dt.28.08.2023** before 14:00 Hrs.

PRO No. 114/2023 Dated 17.08.2023

**Executive Engineer**
**O&M, MSEDCL**
**Civil Lines Division, Nagpur**


## कर्मचाऱ्यानेच केली कंपनीत चोरी

**नागपूर, दि. १५ ऑगस्टः** एका कर्मचाऱ्याने कंपनीच्या गोदामातून २.२९ लाख रुपये किंमतीच्या इलेक्ट्रीक साहित्यांची चोरी केली. त्यानंतर चोरीचा माल विकण्यासाठी ज्या कंपनीचे ते इलेक्ट्रीक साहित्य होते त्याच कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क केला आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकला. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली. देवानंद गुलाब लोखंडे (२९) रा. ब्रम्हपुरी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून २ लाख २९ हजार १०५ रुपये किमतीचे इलेक्ट्रीक साहित्य जप्त केले आहे. पोलिसांनी नितीन माधव सातोकर (५६) रा. गांधीनगर, अंबाझरीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

## २,८४७ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर, दि. १५ ऑगस्टः** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण २,८४७ वाहन चालकांवर कारवाई करून ५,०९,१०० रुपयांचा दंड वसूल केला. तर शहर पोलिसांनी मुंबई दारूबंदी कायद्यान्वये १० व एनडीपीएस अनव्ये ५ अशा १५ प्रकरणात १० आरोपींवर कारवाई करून १०,५४५ रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये २ प्रकरणात २ आरोपींवर कारवाई करून २०,६९० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.


**कार्यालय पोलीस आयुक्त, नागपूर शहर**

पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

ई-मेल - cpnagpur.rkbranch@mahapolice.gov.in

क्र.: पोआना / भापा-प्रलि / वाहतुक शाखा / साहित्य खरेदी / / २०२३ नागपूर दि. १७/०८/२०२३

**ई-निविदा सुचना**

**बॅरिकेड्स, पोर्टेबल वाहतुक सिग्नल आणि व्हीएमएस बोर्ड या साहित्याच्या खरेदीसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे.**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील पोलीस उपआयुक्त, वाहतुक, नागपूर शहर कार्यालयास आवश्यक बॅरिकेड्स, पोर्टेबल वाहतुक सिग्नल आणि व्हीएमएस बोर्ड या साहित्याच्या खरेदीसाठी ई-निविदा (Technical Bid / Price Bid ) मागविण्यात येत आहे. ई-निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध आहे.

| Sr.No. | List of Items | Tender fee | EMD |
|---|---|---|---|
| 1 | कोलॅप्सीबल रोड बॅरीकेड्स आणि लोखंडी / स्टील बॅरीकेड्स Annexure "A" | 5,400/- | 54,000/- |
| 2 | पोर्टेबल वाहतुक सिग्नल Annexure "B" | 3,600/- | 18,000/- |
| 3 | व्हीएमएस बोर्ड, Annexure "C" | 5,400 /- | 54,000/- |

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा ऑनलाईन उपलब्ध दिनांक | दि. १७/०८/२०२३ चे ११.०० वा. पासुन ते दि.३१/०८/२०२३ चे १६.०० वा. पर्यंत. |
| २) | निविदा पूर्व बैठक | दि. २१/०८/२०२३ चे १२.०० वा. |
| ३) | ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक | दि. ०१/०९/२०२३ चे १६.०० वा. |

(डॉ. अश्विनी पाटील)
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त कार्यालय,
नागपूर शहर.

क्र. संभावज / नाग / ३८५/२०२३



**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.: U65910WB1993FLC060810**
**शाखा कार्यालय:** नागपुर

L&T Finance

**गहाण मालमत्तेच्या विक्रीचा जाहीर लिलाव**

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचा अधिकृत अधिकारी प्रतिभूतीकरण आणि वित्तीय मत्तांची पुनर्बांधणी आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी कायदा, 2002 (54 वर्ष 2002) अन्वये आणि सदर कायद्यान्वये प्राप्त शक्तींचा वापर करत पुढील मालमत्तेचा **'जिथे आहे तिथे तत्त्वावर'** आणि **'जे आहे ते'** परिस्थितीत **'जाहीर ई-लिलावाच्या'** माध्यमातून देय रकमा आणि त्यांवरील व्याज, शुल्के आणि खर्च इ. वसुल करण्यासाठी ई-लिलाव करत आहे.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 14.08.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. मुकेश गोपालदास जैन 2. जैन असोसिएट्स | मालमत्तेचा पत्ता : सर्व आरसीसी सुपरस्ट्रक्चर, अपार्टमेंट क्र. 402, चटई क्षेत्रफळ, 56.188 चौ.मी. आणि सुपर बांधकाम क्षेत्रफळ 97.547 चौ.मी., चौथा मजला, इमारतीचे नाव ''आस्मा एन्क्लेव्ह्ज-6'' सोबत अविभाज्य भाग 12.497% भाग आणि व्याज मालिक मकबुजा जमिनीच्या अशा सर्व भाग आणि खंडांमध्ये ज्यांचे भूखंड क्र. 29 आणि 30 आहेत एकूण अधिमापन सुमारे 275 चौ.मी. खान गृहनिर्माण सहकारी संस्था लि. चा आराखडा, नागपुर, संपूर्ण जमिनीचा एक भाग, खो.क्र. 11/2, मौजे - झिंगाबाई टकली पी.एच.क्र. 11, शहर सर्व्हे क्र. 13, शीट क्र. 14, महानगरपालिका घर क्र. 498/सी/29+30, प्रभाग क्र. 61 येथे स्थित, नागपुर इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट अँड नागपुर म्युनिसिपल कॉर्पोरेशन नागपुर ता. आणि जि. नागपुर आणि त्याच्या सीमारेषा खालीलप्रमाणे पूर्वेला : भूखंड क्र. 28, पश्चिमेला : मोकळी जागा उत्तरेला : आराखड्याची जमीन दक्षिणेला : 9 मीटर रुंद रस्ता | NGPHL18000446, NGPHL19000008 | 23 जून 2023 | रु. 2,81,397.30/- | रु. 48,98,202.83/- | रु. 28,13,973/- | 13/09/2023 | 20/09/2023 दुपारी 3 वाजता |
| 1. सचिन रामकृष्ण दुरगकर 2. कृतिका सचिन दुरगकर | मालमत्तेचा पत्ता : चेंबर क्र. 303, अधिमापन 37.37 चौ.मी. म्हणजेच 402.25 चौ.फू. तिसरा मजला, इमारतीचे नाव ''खुल्लार चेंबर'', सोबत 1.845% अविभाजित भाग आणि स्वारस्य, एनआयटी भाडेपट्टाधारित भूखंड, महानगरपालिका घर क्र. 145, प्रभाग 3 शीट क्र. 10/81, शहर सर्व्हे क्र. 3109 मौजे - सीताबुलदी, नागपुर. सीमारेषा : पूर्व - अभ्यंकर रोड; पश्चिम - ट्रस्ट सिरिअल क्र. 19/सी; उत्तर - 5 फूट रस्ता; दक्षिण - मालविया रोड | NGPHL15000421, NGPHL15000469 | 26 जून 2023 | रु. 6,63,152/- | रु. 71,92,769.68/- | रु. 66,31,520/- | 13/09/2023 | 20/09/2023 सकाळी 11 वाजता |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहिर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. जाहीर ई-लिलाव उपरोक्त दिनांक व वेळेरोजी पार पाडण्यात येईल, व सदर वेळी उपरोक्त प्रतिभूत मत्तांची **'जिथे आहे तिथे'** तत्त्वावर आणि **'जे आहे ते'** तत्त्वावर विक्री केली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **18/09/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **20/09/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **21/09/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शेखर काळे, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126 एल अँड टी फायनान्स लि, - कार्यालय : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 18.08.2023
**ठिकाण:** नागपुर

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड